# दक्षिण आफ्रिकेतील क्रिकेटचे पुनरागमन लांबणीवर

## ज्या भागात सामना होणार होता, त्या भागात कोरोनाबाधित रूग्णांच्या संख्येत मोठी वाढ

**वृत्तसंस्था**

सेंच्युरियन, दि. २२ - सेंच्युरियनच्या सुपरस्पोर्ट पार्क मैदानावर २७ जूनला दक्षिण आफ्रिकेतील तीन संघांमध्ये होणाऱ्या नियोजित अनोख्या क्रिकेट सामन्याला दक्षिण आफ्रिका सरकारकडून परवानगी न मिळाल्यामुळे तूर्तास तरी या आगळ्या-वेगळ्या सामन्याचे आयोजन लांबणीवर टाकण्यात आले आहे.

ज्या भागात हा सामना खेळवला जाणार होता, त्या भागात गेल्या आठवड्यात कोरोनाबाधित रूग्णांच्या संख्येत बरीच वाढ झाल्याने सरकारने हा निर्णय घेतल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाची भीती लक्षात घेता हा सामना सध्या तरी खेळवण्यात येऊ नये असे द. आफ्रिका सरकारकडून सांगण्यात आले आहे. असा सामना भरवण्यासाठी आणि प्रेक्षकांना त्यात समाविष्ट करण्यासाठी




अजून तयारीची गरज आहे. आवश्यक ती तयारी करून लवकरच हा सामना खेळवण्याचा प्रयत्न करण्यात येईल, अशी माहिती द. आफ्रिका क्रिकेट मंडळाने प्रसिद्धीपत्रकामार्फत दिली.

इतर क्रिकेट सामन्यांपेक्षा हा सामना आगळावेगळा आहे. कारण हा सामना दोन नव्हे तर तीन संघांदरम्यान खेळला जाणार असून त्याचे नियम वेगळे असणार आहेत.

माजी कर्णधार एबी डिव्हिलियर्स, विद्यमान कर्णधार क्विंटन डी कॉक आणि वेगवान गोलंदाज कॅगिसो रबाडा यांच्या नेतृत्वाखालील तीन संघांचा हा सामना २७ जूनला खेळण्यात येणार होता, पण आता सामन्याचे आयोजन लांबणीवर पडले आहे.

या सामन्याची अधिकृत घोषणा बुधवारी करण्यात आली होती. हा सामना निधी जमवण्यासाठी खेळण्यात येणार असून यास सॉलिडॅरिटी कप असे नाव देण्यात आले आहे. या सामन्यातून जमा झालेला निधी करोना व्हायरसमुळे अडचणीत सापडलेल्यांना मदत म्हणून दिला जाणार आहे.

कोरोना व्हायरसमुळे बऱ्याच दिवसांपासून क्रिकेट बंद आहे. मात्र आता क्रिकेट हळूहळू पूर्वपदावर येत आहे. वेस्ट इंडिजचा संघ इंग्लंड दौर्‍यावर असतानाच आता दक्षिण आफ्रिकेतही नव्या ढंगात क्रिकेटचे पुनरागमन होणार होते. एक अनोखा सामना खेळला जाणार होता. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेतील अनुभवी आणि नामवंत खेळाडू सामील होणार होते,

# २०११ ची वर्ल्ड कप फायनल फिक्स होती का, याची सचिनसाठी तरी चौकशी करा -अरविंदा डि सिल्वा

**वृत्तसंस्था**

कोलंबो, दि. २२ - २०११ ची वर्ल्ड कप फायनल फिक्स होती, अशा श्रीलंकन माजी क्रीडा मंत्र्यांनी केलेल्या दाव्याची किमान सचिन तेंडुलकरसाठी तरी चौकशी करा, अशी आग्रही मागणी माजी कर्णधार आणि तत्कालीन श्रीलंका संघाचे मुख्य निवडकर्ते

अरविंदा डि सिल्वा यांनी केली आहे.

अरविंदा डि सिल्वा या प्रकरणी मत व्यक्त करताना म्हणाले की, आयसीसी, बीसीसीआय आणि एसएलसी या तिघांनीही सरळ हा सामना फिक्स होता का, याचा तपास करावा. सचिन तेंडुलकर सारखा महान फलंदाज आपल्या समृद्ध कारकिर्दीत एक विश्वचषक जिंकला. त्याच विजेतेपदावर अशा प्रकारे प्रश्न उपस्थित केल्याने त्याच्या प्रतिमेला देखील तडा जाऊ शकतो. त्यामुळे किमान सचिन आणि त्याच्या असंख्य चाहत्यांसाठी तरी भारत सरकार आणि क्रिकेट बोर्डाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तपासाला सुरुवात करावी.

भारत आणि श्रीलंका यांच्यात २०११ साली मुंबईतील वानखेडे स्टेडिअमवर झालेला विश्वचषकाचा अंतिम सामना फिक्स होता, असा दावा श्रीलंकेचे माजी क्रीडा मंत्री महिंदानंद अलुथगमगे यांनी केला होता. ते श्रीलंकेतील न्यूज फर्स्ट वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते. त्यांच्या या दाव्यानंतर

**श्रीलंकेच्या माजी क्रीडा मंत्र्यांनी केला होता घोटाळेबाजीचा दावा**

चर्चांना उधाण आले.

श्रीलंकेचा माजी खेळाडू महेला जयवर्धने, २०११ विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात श्रीलंकेचा कर्णधार असलेला कुमार संगकारा या दोघांनी हे आरोप फेटाळून लावले. सामन्यात शेवटच्या क्षणाला संघात मुद्दाम बदल करण्यात आले, असाही दावा माजी क्रीडामंत्र्यांनी केला होता. त्यानंतर आता माजी कर्णधार आणि तत्कालीन श्रीलंका संघाचे मुख्य निवडकर्ते अरविंदा डि सिल्वा यांनी या प्रकरणी मत व्यक्त केले.

डि सिल्वा यांनी सांगितले की, काही लोक खळबळजनक दावा करतात आणि धडधडीत खोटं बोलतात. पण प्रत्येक वेळी आपण त्यांना असंच खोटं बोलून देऊ शकत



नाही. म्हणूनच मला असं वाटतं की आयसीसी, बीसीसीआय आणि एसएलसी या तिघांनीही सरळ हा सामना फिक्स होता का, याचा तपास करावा. किमान सचिन आणि त्याच्या असंख्य चाहत्यांसाठी तरी भारत सरकार आणि क्रिकेट बोर्डाने या प्रकरणाची चौकशी करावी आणि तपासाला सुरुवात करावी, म्हणजे सत्य समोर येईल आणि खेळाला गालबोट लागणार नाही.

श्रीलंकेचे माजी क्रीडा मंत्री महिंदानंद अलुथगमगे यांनी म्हटले होते की, २०११ विश्वचषकाचा अंतिम सामना फिक्स होता. मी माझ्या म्हणण्यावर ठाम आहे. मी क्रीडामंत्री असताना हा प्रकार घडला आहे. मी हे खूप काळजीपूर्वक आणि जबाबदारीने सांगतो आहे. पण देशासाठी मी यामध्ये कोणाचाही नाव घेणार नाही. भारताविरुद्ध अंतिम सामना आपण जिंकू शकलो असतो, पण तो फिक्स केला गेला होता. मी यात खेळाडूंना गुंतवू इच्छित नाही, पण काही लोकांनी हा सामना फिक्स करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावली. अंतिम सामन्यात श्रीलंकेचा जो संघ खेळला तो मुळात आम्ही निवडलेला संघच नव्हता. शेवटच्या क्षणाला क्रीडामंत्री या नात्याने मी किंवा कोणत्याही संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा न करता ४ नवीन खेळाडूंना संघात जागा देण्यात आली.

श्रीलंकन क्रिकेट बोर्डाच्या अधिकाऱ्यांनाही याबद्दल अंधारात ठेवण्यात आले, असा आरोप वृत्तवाहिनीशी बोलताना अलुथगमगे यांनी केला होता.

# ''चुका करणं हा प्रत्येक माणसाचा स्वभाव आहे आणि त्या चुका मान्यही करता यायला हव्यात''

**वृत्तसंस्था**

नवी दिल्ली, दि . २२ - आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पंच म्हणून निवृत्ती स्वीकारल्यानंतर स्टिव्ह बकनर यांनी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला दोनवेळा चुकीच्या पद्धतीने बाद दिल्याचे अखेर मान्य केले. ते मेसन अँड गेस्ट या रेडीओ कार्यक्रमात बोलत होते.

बकनर यांनी सांगितले की, सचिनला मी दोनवेळा चुकीच्या पद्धतीने बाद दिल्यायाचे मला आठवतंय. कोणत्याही पंचासाठी चुकीचे निर्णय देणं ही चांगली बाब नाही, आयुष्यभर त्याला ही गोष्ट सहन करावी लागते, पण चुका या माणसाकडूनच होत असतात.

ते म्हणाले की, ऑस्ट्रेलियात असताना एकदा मी सचिनला पायचीत बाद ठरवले होते. पण त्यावेळी चेंडू वरुन जात होता. दुसऱ्या वेळी भारतात खेळत असताना मी सचिनला झेलबाद दिलं होतं. पण त्यावेळेसही चेंडू बॅटला लागलेला नव्हता.

त्यांनी स्पष्ट केले की, इडन गार्डन्सवर सामना असेल आणि भारतीय संघ फलंदाजी करत असेल तर

**निवृत्ती स्वीकारल्यानंतर स्टिव्ह बकनर यांनी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला दोनवेळा चुकीच्या पद्धतीने बाद दिल्याचे अखेर केले मान्य**



लाखभर प्रेक्षकांच्या आवाजात काहीही ऐकू येत नाही.

ते म्हणाले की, या चुकांबद्दल मलाही खेद आहे. मी माणूस आहे, चुका करणं हा प्रत्येक माणसाचा स्वभाव आहे आणि त्या चुका मान्यही करता यायला हव्यात.

बकनर यांनी सचिनला दोन वेळा चुकीच्या पद्धतीने बाद दिल्याबद्दल खेद व्यक्त केला.

आंतरराष्ट्रीय पंच स्टिव्ह बकनर हे आपल्या कारकिर्दीच्या अखेरच्या टप्प्यात सतत वादग्रस्त निर्णय देण्यासाठी परिचीत होते.

सचिनला चुकीच्या पद्धतीने बाद दिल्याचा राग अजुनही क्रिकेट प्रेमींच्या मनात कायम आहे. एकेकाळी अचूक निर्णयासाठी आयसीसीचे सर्वोत्तम पंच म्हणून ओळख असलेल्या बकनर यांची आपल्या कारकिर्दीच्या अखेरच्या टप्प्यातली कामगिरी फारशी चांगली नव्हती.

निवृत्तीनंतर स्टिव्ह बकनर न्यू-यॉर्कमध्ये स्थायिक झाले आहेत. सचिन आणि स्टिव्ह बकनर यांच्यातील कथित द्वंद्वावर आयसीसीनेही २०१९ मध्ये एक गमतीशीर ट्विट केले होते.

### रणजी क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी टिपणारे

# गोलंदाज राजिंदर गोयल यांचे निधन

**वृत्तसंस्था**

नवी दिल्ली, दि. २२ - रणजी ट्रॉफी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक बळी टिपणारे लेग स्पिनर राजिंदर गोयल यांचे रविवारी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते. रणजी ट्रॉफीच्या इतिहासात त्यांनी सर्वाधिक ६३७ बळी टिपले. इतर कोणत्याही खेळाडूला अद्याप ६०० बळींचा टप्पा गाठता आलेला नाही.



गोयल यांनी रणजी क्रिकेट गाजवले, पण दुर्दैवाने त्यांना भारतीय संघात स्थान मिळू शकले नाही.

गोयल यांनी रणजीच्या एका हंगामात २५ पेक्षा जास्त बळी टिपण्याचा कारनामा १५ वेळा केला. हरयाणाच्या गोयल यांनी १५७ सामने खेळले. ५५ धावांत ८ बळी ही त्यांची सर्वोत्तम कामगिरी होती. त्यांनी ५९ वेळा एका डावात ५ बळी तर १८ वेळा एका सामन्यात १० बळी टिपण्याची किमया साधली. त्यांनी आपल्या रणजी कारकिर्दीत १,०३७ धावाही केल्या. ते पतियाळा, पंजाब आणि दिल्ली या संघांकडून क्रिकेट खेळले.

बीसीसीआयसह काही माजी क्रिकेटपटूंनी त्यांच्या निधनाबाबत शोक व्यक्त केला. गोयल यांच्या निधनाने एक महान लेग-स्पिनर भारताने गमावल्याची भावना चाहत्यांनी व्यक्त केली.

# क्रिकेटपटूंनी मानसिकदृष्टय़ा कणखर राहण्याची गरज -संदीप पाटील

**वृत्तसंस्था**

नवी दिल्ली, दि. २२ - कोरोना काळात क्रिकेटपटूंनी मानसिकदृष्टय़ा कणखर राहण्याची गरज आहे. त्याबरोबरच दुखापतींपासूनही दूर राहण्याची आवश्यकता आहे. त्यामुळेच कोरोनानंतर क्रिकेटला सुरुवात झाल्यायावर क्रिके टपटूंना जोमाने पुनरागमन करता येईल, असे प्रतिपादन भारताचे माजी फलंदाज संदीप पाटील यांनी केले.

कोरोनामुळे तीन महिने क्रिकेट पूर्णपणे ठप्प असून ८ जुलैपासून इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील कसोटी मालिकेने या खेळाची सुरुवात अपेक्षित आहे.

भारताच्या क्रिकेट संघासाठी इतक्यात कोणतीही क्रिकेट मालिका प्रस्तावित नाही. या स्थितीत भारतीय खेळाडूंसाठी पुनरागमन हे शारीरिक आणि मानसिकदृष्टय़ा आव्हानात्मक असेल, असे संदीप पाटील यांना वाटते.

ते म्हणाले की, 'कोणत्याही खेळाडूसाठी पुनरागमन हे दुखापतींना निमंत्रण देणारे असू शकते. या स्थितीत दुखापतींना दूर ठेवण्याचे आव्हान क्रिकेटपटूंसमोर आहे. दुखापतींना दूर ठेवताना मनानेही तितकेच खंबीर राह-ावे लागेल.



त्यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही स्पर्धेत पुनरागमन करताना खेळाडूंची मनाची खंबीरता मोठी असावी लागते. ज्या वेळेस मी केनियाचा प्रशिक्षक होतो तेव्हा खेळाडूंना कोणत्याही मालिकेआधी मनाने खंबीर होण्याचा सल्ला द्यायचो.

पाटील यांनी खेळाडूंच्या मानसिक सामर्थ्यांचे महत्त्व सांगताना १९८३च्या विश्वचषकाच्या अंतिम फेरीतील भारत विरुद्ध वेस्ट इंडिज लढतीचे उदाहरण दिले.१९८३च्या विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे सदस्य असलेल्या संदीप पाटील यांनी सांगितले की,१९८३च्या विश्वचषकाच्या अंतिम लढतीत भारताला १८३ धावांमध्ये रोखण्यात आले होते. आम्ही पराभूत होऊ, असेच त्या वेळेस वाटत होते. मात्र त्याच वेळेस सांघिक भावना जागृत झाली आणि मैदानावर क्षेत्ररक्षणासाठी उतरण्यापूर्वी जिंकायचेच, हा निश्चय आम्ही संघातील प्रत्येकाने केला. त्यानंतर जे घडले तो इतिहास सर्वांनाच माहिती आहे.

सध्या ६३ वर्षीय असलेले पाटील यांनी सांगितले की, वेस्ट इंडिजच्या १९८३च्या संघातील फलंदाजांना गोलंदाजी करणे सोपे नव्हते, गॉर्डन ग्रिनीज, व्हिव रिचर्ड्सरसारखे फलंदाज विंडीजच्या संघात होते. मात्र त्या वेळेस विश्वचषकावर आमचेच हात आहेत, असे चित्र आम्ही डोळ्यासमोर ठेवले होते. फक्त क्रिकेटपटूच नाही तर कोणत्याही खेळाडूसाठी मानसिकदृष्टय़ा खंबीर असणे महत्त्वाचे असते, तरच त्याचा निभाव लागतो.

## विविध वृत्त

# वसई-विरार महापालिकेकडून पावसाळापूर्व वृक्ष छाटणी कामाला वेग

**प्रतिनिधी**

विरार, दि. २२ - आला आहे. पावसाळ्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये व रस्त्याकड़ेच्या झाडांची वाढ योग्य दिशेने व्हावी, यासाठी दरवर्षी महापालिकेकडून वृक्ष छाटणी करण्यात येत असते.

वसई-विरार महापालिकेने यंदाही पावसाळापूर्व नालेसफाईसोबत वृक्ष छाटणी कामाला सुरुवात केली आहे. दरवर्षी मुसळधार पावसात झाड़े उन्मळून पड़णे, झाडांच्या फांद्या विद्युत वाहिनीवर पडून अपघात घडणे असे अनुचित प्रकार घड़त असतात. त्याअनुषंगाने वसई-विरार महापालिका वृक्ष छाटणीची कामे करत असते.

या शिवाय झाडांची योग्य दिशेने वाढ व्हावी, हा उद्देशही यामागे असतो; अशी माहिती महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागातून देण्यात आली.त्यानुसार मागील दोन महिन्यांपासून पावसाळापूर्व वृक्ष छाटणी कामाला वेग आला असून।; प्रभाग अमधील विराट नगर, एम. बी. इस्टेट, यूनिटेक परिसर, बोळींज-सोपारा रस्ता, पद्मावती नगर, आगाशी, डोंगरपाड़ा गांव आदी भागातील बहुतांश वृक्ष छाटणी पूर्ण झाली आहे, अशी माहिती वृक्ष प्राधिकरण विभागाकडून देण्यात आली.

तर प्रभाग बमधील सेंट्रल पार्क रस्ता, मोरेगांव, मौर्या नगर आणि प्रभाग सीमधील फूलपाड़ा रोड, दूध दर्या रोड, मकवाना रोड येथील वृक्ष छाटणीसोबतच; महावितरणच्या वायरवर धोकादायक ठरणाऱ्या झाडांची छाटणी करण्यात आल्याची माहिती पालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागातून प्राप्त झाली आहे.

# रायगड जिल्ह्यातील हजारो विक्रम मिनिडोअर चालकांवर उपासमारीची वेळ

**वार्ताहर**

पेण, दि. २२ -लॉकडाउन सुरू झाल्यापासून म्हणजेच जवळपास ७५ दिवस रायगड जिल्ह्यातील हजारो विक्रम मिनिडोअर चालक घरीच बसून आहेत. त्यामुळे त्यांच्यावर आता उपासमारीची वेळ आलेली आहे.

कोरोना या महामारीमुळे अनेकांचे रोजगार बुडाले आणि अनेकांनी आपल्या नोकऱ्याही गमावल्या. राज्य आणि केंद्र सरकार सध्या कोरोना विरुद्धची लढाईत व्यस्त आहेत.

पण समाजतील कित्येक घटक आजही मदतीपासून वंचित आहेत. त्यातीलच एक मिनिडोअर चालक.लॉकडाउनच्या आधी सर्व व्यवस्तित सुरु होत. प्रवाशांची ने-आण करण्यासाठी राज्य परिवहन नंतर रायगड जिल्ह्यात अग्रेसर असणारी काळी पिवळी मिनिडोअर (टॅक्शी). लॉकडाउन आधी प्रत्येक मिनिदोअरमध्ये ७ ते ८ माणसे बसत आणि प्रवासी आपला प्रवास करत आणि यातूनच मिनिडोअर चालकांचा आणि त्याच्या परिवाराचा उदरनिर्वाह होई पण लॉकडाउन सुरू झाल्यापासून म्हणजेच जवळपास ७५ दिवस रायगड जिल्ह्यातील हजारो विक्रम मिनिडोअर चालक घरीच बसून आहेत. त्यामुळे त्यांच्यावर आता उपासमारीची वेळ आलेली आहे.

यांची एकच मागणी आहे. जसे लॉकडाउन काळात दिल्ली येथील केजरीवाल सरकारने टॅक्सी व रिक्षा चालकांना ५ हजार रुपयांचे पॅकेज दिले, तर आंध्र प्रदेशच्या रेड्डी सरकारने तेथील टॅक्सी चालकांना सरसकट १० हजार रुपयांचे पॅकेज जाहीर केले.

**खासदार तटकरे यांची घेतली भेट**

आर्थिक पॅकेज महाराष्ट्र सरकारनेही द्यावे. यासाठी रायगड जिल्हा मिनिडोअर चालक मालक संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आज काही पदाधिकाऱ्यांनी खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांची भेट घेतली आणि त्यांना या आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी मध्यस्ती करण्याची विनंती केली.

सूचना

एलएचबी बोगीची कामे

**अ.क्र. १. कामाचे नाव :** एलएचबी बोगीचे स्ट्रिपिंग, क्लिनिंग, आणि पेंटिंग, **अंदाजे किंमत : (रु.) :** रु. २६,६७,५७४.२० **निविदा प्रपत्राची किंमत (रु.) :** ३०००/- **इअर (रु.) :** रु. ५३,४००/- **पुतर्ता कालावधी :** १६ महिने. वरील ई-निविदा सादर करण्याची वेळ आणि तारीख **१४.०७.२०२०** रोजी स. ११.०० वा. पर्यंत ई-निविदेचा संपूर्ण तपशिल रेल्वेची अधिकृत वेबसाईट **http://www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे. निविदेचा संपूर्ण तपशिल चिफ वर्कशॉप मॅनेजर, परेल यांच्या ''सूचना फलकावर'' उपलब्ध आहे. **खुली निविदा सूचना क्र : (१) पीआर-एलएचबी-बीसी-१९-२०-४६८ए.** 152

आरपीएफ सिक्युरिटी हेल्पलाईन १८२

# मनवेलपाड़ा गावातील स्मशानभूमीचा मार्ग मोकळा

## स्मशानभूमीलगतच्या नाल्यावर २०० फूट लांबीचा स्लॅब

**संजय राणे**

**विरार, दि. २२ -मनवेलपाड़ा गावातील नाल्यावर वसई-विरार महापालिकेकडून तब्बल २०० फूट लांब, २० फूट ८ इंच रुंदीचा आणि १८ इंच जाड़ीचा स्लॅब टाकण्याचे काम सुरू असल्याने स्मशानभूमीला विस्तृत जागा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या स्लैबसह अन्य दोन स्लॅबसाठी महापालिका प्रत्येकी अंदाजे ७३ लाख रुपये खर्च करणार असल्याची माहिती सूत्रानी दिली आहे.**

**मनवेलपाड़ा गावातून पद्मननगर व सीएम नगर येथे जाणारा मार्ग आतापर्यंत येथील स्मशानभूमीतून जात होता.**

**येथील नागरिकांना आपली दैनंदिन ये-जा याच स्मशानभूमीतून करावी लागत होती; मात्र त्यामुळे अनेक अडचणी उद्भवत होत्या.**

**स्मशानभूमीशेजारील अतिक्रमणांमुळे स्मशानभूमीही आक्रसली होती. यामुळे येथे क्रियाकर्म करण्यासही बाधा येत होती. शिवाय स्मशानभूमीशेजारीच २० फूट रुंदीचा नाला असल्याने अपघात आणि अनारोग्याची शक्यताही होती.**

**त्यामुळे या नाल्यावर स्लैब टाकून रस्ता बनवण्यासोबतच स्मशानभूमीसाठीही विस्तृत जागा उपलब्ध करून देण्याची मागणी सीएम नगर व पद्मननगर येथील नागरिकांनी काही वर्षे पालिकेकड़े लावून धरली होती.**

**मागील काही वर्षांच्या अडचणी आणि समस्यांनंतर येथील नागरिकांची ही मागणी पूर्ण झाली असून या नाल्यावर महापालिकेकडून स्लॅब टाकण्यात येत आहे. या स्लैबचा रस्ता म्हणून वापर करण्यात येणार आहे. यामुळे शेजारील स्मशानभूमीकरताही विस्तृत जागा उपलब्ध होणार आहे.**

**मागील दीड महिना काम सुरू असून येत्या एक-दोन दिवसांत पूर्ण होईल**

हा स्लॅब २०० फूट लांब, २० फूट ८ इंच रुंद आणि १८ इंच जाड़ीचा आहे. लॉकडाउनच्या अगोदर हे काम हाती घेण्यात आले होते; त्यानंतर मात्र थोड़े संथ झाले होते. आता मागील दीड महिना हे काम सुरू असून; येत्या एक-दोन दिवसांत पूर्ण होईल.

**- भूषण रानमाळे, अभियंता, वसई-विरार महापालिका**

**विस्तृत जागा मिळाल्यामुळे लाकडे ठेवण्यासाठी जागा उपलब्ध होणार**

या स्लॅबमुळे सीएमनगर व पद्मननगर येथे जाण्यासाठी रस्ता तयार झाला आहे. तर स्मशानभूमीकरताही विस्तृत जागा मिळाली आहे. त्यामुळे स्मशानभूमीत लाकडे ठेवण्यासाठी जागा उपलब्ध होणार आहे. या शिवाय सुरक्षा रक्षक केबिन व छोट्याशा गार्डनचे कामही पालिकेकडून करण्यात येणार आहे. सोबत स्मशानभूमीतून निघणारा धुराची समस्या सोड़वण्यासाठी १०० फूट उंचीची चिमणीही बसवण्यात येणार आहे.

**- विनोद सुदाम पाटील, समाजसेवक**

**अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि. समापनातील - च्या मत्तांच्या संपादनासाठी स्वारस्याच्या अभिव्यक्ती (ईओआय) करिता निमंत्रण**

**अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड**

**४ x ६१.५ एमडब्ल्यु पॉवर प्लॉट नागपूर, महाराष्ट्र**

**[राखीव किंमत : १५० कोटी]**

निमंत्रणाच्या बाबतीत रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र) च्या विना-परतावा शुल्कासह इच्छुक अर्जदार ईओआय सादर करू शकतात. ईओअयच्या तपशिलावर अटी आणि शर्तींसाठी भेटा : **http://vinodkothari.com/bankrupcty code/amnepl/** किंवा **amneplliquidation@gmail.com** वर एक ई-मेल करा. सेबी नोंदणीकृत मर्चंट बँकर्स/समापन/सीआयआरपी/सरफैसी अंतर्गत मत्तांच्या विक्रीत सिद्ध केलेली क्षमता असलेले नामांकित वित्तीय सल्लागार देखील परिसमापकांकडून केल्या जाणाऱ्या प्रस्तावित विक्रीसाठी संभाव्य अर्जदारांचे स्वारस्य दाखवू शकतात.

**आवश्यक विना परतावा शुल्कासह ईओआय प्राप्त करण्याची अंतिम तारीख आहे ३०.०६.२०२० सं. ७:०० पर्यंत**

**विनोद कुमार कोठारी, परिसमापक**
**अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि. - समापनातील**
**पत्ता : १००६-१००९, क्रिष्णा बिल्डिंग,**
**२२४ एजेसी बोस रोड, कोलकात्ता - ७०००१७**
**ई-मेल : resolution@vinodkothari.com**
**नोंदणी क्र : आयबीबीआय/आयपीए-००२/आयपी-एन०००१९/२०१६-१७/१००३३**
**दिनांक : २२.०६.२०२०**

हे पत्र संचालक इंडियन नॅशनल प्रेस (बॉम्बे) प्रा. लिमिटेड यांच्याकरिता जी. एल्. लखोटिया यांनी जर्नल प्रेस, फ्री प्रेस हाऊस, २१५, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१ येथे छापून प्रसिध्द केले. दिल्ली कार्यालय : १/१८ आय्.एन.एस्. बिल्डिंग, रफी मार्ग, नवी दिल्ली. ११०००१. कोलकाता कार्यालय : ८, मोइरा, स्ट्रीट, कोलकाता- ७०००१७. RNI No. 1691/57
मुंबई दूरध्वनी क्रमांक संपादकीय २२८५३३३५ (विस्तार -१३३) जाहिरात २२८७४५६६, २२८५३३३५, (विस्तार -१२४ व १२५) २२८५३३४२ AIR SURCHARGE 50 PAISE ONLY. E-Mail : navshakti.news@gmail.com/ mail@fpj.co.in **व्यवस्थापकीय संपादक : गिरधरलाल लखोटिया, संपादक: सुकृत खांडेकर** Reg. No. MCS/049/2018-20